**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक 24/02/2026**

**आरोपी लोकसेवक** - श्री.राजोबा विठोबा काथार वय-50 वर्ष, व्यवसाय- ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) नेम.रहाळपट्टी तांडा, जटवाडा, ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांचेकडुन 10,000/- रुपये लाच स्विकारल्याने आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | श्री.राजोबा विठोबा काथार - ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) नेम.रहाळपट्टी तांडा, जटवाडा, ता.जि.छत्रपती संभाजीनगर रा.वसंतनगर, जाधववाडी, छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | 20,000/- (विस हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 10,000/- (दहा हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री. शांतीलाल चव्हाण, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री.राजु नांगलोत, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार हे नोकरीस असलेल्या ठेकेदार यांनी मौजे रहाळपटटी येथे ग्राम निधी योजने अंतर्गत केलेल्या पाणी पुरवठा कामाचे बिल व घनकचारा चे बिल ठेकेदार यांना अदा केल्याचे बक्षीस म्हणुन आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे 20,000/-रुपये लाचेची मागणी केली. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 16/02/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजमावली असता, आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे मौजे रहाळपटटी येथे ग्राम निधी योजने अंतर्गत केलेल्या पाणी पुरवठा कामाचे बिल व घनकचारा चे बिल ठेकेदार यांना अदा केल्याचे बक्षीस म्हणुन 20,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 10,000/- हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले.<br>आलोसे यांच्या लाच मागणी नंतर दिनांक 24/02/2026 रोजी शासकीय पंच समक्ष सापळा कारवाई दरम्यान टि.व्ही.सेंटर, येथील दादा डोसा या हॉटेलमध्ये आलोसे यांनी स्वतः तक्रारदार यांच्या कडून 10,000/-हजार रुपये लाच रक्कम पंच साक्षीदारा समक्ष स्वीकारली.आलोसे यांनी लाच रक्कम स्वीकारल्यानंतर पंच समक्ष त्यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले.<br>आरोपी लोकसेवक यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द सिडको पोलीस स्टेशन छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केली असुन पुढील तपास ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर घटक करणार आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, पोलीस उप अधीक्षक श्री राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री.शांतीलाल चव्हाण यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह. रवींद्र काळे, अशोक नागरगोजे,विलास चव्हाण, रामेश्वर ताठे, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.